MAHATMA GANDHI MISSION

# राष्ट्रीय सेवा योजना



महात्मा गांधी मिशन

# एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी सलग्नीत

(ISO 9001 : 2015 Certified)

एमजीएम हिल्स , गांधेली, औरंगाबाद

www.mgmcft.org

# राष्ट्रीय सेवा योजना

**कार्यक्रम अधिकारी**

प्रा. व्ही.एम. सुक्रे
डॉ. ए.व्ही. खर्डे
प्रा. ए.ए. लोखंडे

**प्राचार्य**

डॉ. एन.आर. चव्हाण

MAHATMA GANDHI MISSION

## एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय

गांधेली, औरंगाबाद

# राष्ट्रीय सेवा योजना

## वार्षिक कार्यक्रमाचा आराखडा (२०१४ –२०१९)

## एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय

गांधेली, औरंगाबाद

## अनुक्रमणिका


| अनु क्र. | विवरण | पृष्ठ. क्र |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | – |
| २ | नियमित कार्यक्रमाचा संक्षिप्त अहवाल | – |
| ३ | विशेष शिबिराची माहिती | – |
| ४ | छायाचित्रे | – |
| ५ | शिबिरातील उपस्थित स्वयंसेवकांची यादी | |



माझ्यासाठी नव्हे, तर तुमच्यासाठी हे ब्रीदवाक्य लक्षात घेऊन राष्ट्रीय सेवा योजनेची स्वयंसेवक सेवेची मूल्ये आणि सामाजिक भान ठेवून समाजसेवेसाठी तत्पर असतो. आपले उज्ज्वल भविष्य गाठत असतानाच समाज व राष्ट्राला आपण काही देणे लागतो म्हणून फूल ना फुलाची पाकळी या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाद्वारे राष्ट्रसेवा करण्याचे कार्य महाविद्यालयीन युवक करीत असतो. राष्ट्रीय सेवा योजनेच्या बोधचिन्हाप्रमाणे आजचा स्वयंसेवक हा बोधचिन्हाच्या आठ आरेनुसार अष्टौप्रहर समाजसेवेसाठी बांधील आहे व लाल रंग हे तरुणांचे सळसळते रक्त हे राष्ट्र उभारणीसाठी असल्याचे दिसून येते. राष्ट्रीय सेवा योजना उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता, सामाजिक बांधिलकी यासाठी स्वयंसेवक तत्पर व सक्षम व्हावा, यासाठी राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम व विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर या दोन उपक्रमांद्वारे समाजप्रबोधन करण्याचे कार्य करीत आहे.

महाविद्यालयात रासेयो ची ५० विद्यार्थ्यांची तुकडी असून; कार्यक्रम अधिकारी प्रा. व्ही. एम. सुक्रे, डॉ. ए.व्ही. खर्डे आणि इतर प्राध्यापक वृंद यांच्या मार्गदर्शनाखाली समाजपयोगी विविध उपक्रम नियमित कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येतात. प्रत्येक वर्षी सात दिवसीय विशेष शिबिराच्या माध्यमातून स्वयंसेवकांचा व्यक्तिमत्व विकास करतांना त्यांना ग्रामीण जीवनातील समस्यांची ओळख करून देत त्या सोडविण्यासाठी निस्वार्थ काम करण्यास त्यांना प्रेरित करण्यात येत.

महाविद्यालयाच्या रासेयो कार्यक्रमाची माहिती देणाऱ्या या अहवालास शुभेच्छा !

**डॉ. एन.आर. चव्हाण**
प्राचार्य

# राष्ट्रीय सेवा योजना संकल्पना आणि महाविद्यालयात राबविल्या जाणारे विविध उपक्रम

## प्रस्तावना

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात समाज सेवेची जाणीव निर्माण व्हावी, समाजाच्या सुख दुःखाशी त्यांनी समरस व्हावे. समाजाच्या तळागाळातील व्यक्तीपर्यंत त्यांची नाळ जोडली जावी, सामाजिक प्रश्नांच्या जाणीवेतून कर्तव्य भावना आणि श्रम प्रतिष्ठा निर्माण व्हावी, तसेच समाज सेवेच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास व्हावा आणि राष्ट्रसेवा घडावी, या उद्देशाने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने २४ सप्टेंबर १९६९ रोजी भारताचे तत्कालीन शिक्षण मंत्री मा. व्ही.के.आर.व्ही. राव यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची सुरुवात केली.

## महाविद्यालयातील रासेयो एकक स्थापना

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत औरंगाबाद येथे महात्मा गांधी मिशन संचलित कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय सुरु होऊन पंधरा वर्ष झालीत. महाविद्यालयाच्या शिक्षणाचा उद्देश म्हणजे सढळपणे ज्ञानार्जन व कृषी संशोधन आहे. या बरोबरच महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा ग्रामीण जीवनाशी ऋणानुबंध सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण व्हावी या हेतूने सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षापासून राष्ट्रीय सेवा योजनेचे ५० स्वयंसेवकांच्या एककाची मान्यता मिळविली. महाविद्यालयातील प्रा. ए.व्ही. खर्डे यांची प्राचार्यांद्वारे दि. ०५/१२/२०११ ते १ जुलै २०१८ पर्यंत कार्यक्रम अधिकारी म्हणून काम केले तसेच सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षामध्ये त्यांनी कार्यक्रम अधिकारी प्रशिक्षण केंद्र, अहमदनगर येथून ०७ दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण केले त्या नंतर महाविद्यालयातील प्रा. व्ही.एम सुक्रे यांची प्राचार्यांद्वारे दि. ०१/०७/२०१८ कार्यक्रम अधिकारी म्हणुन नेमणूक करण्यात आली.

### महात्मा गांधी मिशन संचलित कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, गांधेली (औरंगाबाद) च्या सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षा मध्ये राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत आयोजित केलेल्या विशेष निवासी शिबिराची माहिती पुढील प्रमाणे

महात्मा गांधी मिशन संचालित, गांधेली येथील कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर भिंदोन गांधेली जि. औरंगाबाद येथे २१ फेब्रूवारी रोजी उद्घाटन  झाले व गाव दत्तक घेण्यात आले आहे. याअंतर्गत महाविद्यालयाच्या रा. से. यो. एककातर्फे या गावात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भिंदोन,गांधेली येथे स्वच्छता अभियान'राबविण्यात आले.या अभियानाच्या उद्घाटन  प्रसंगी जलक्रांती ग्रुपचे प्रा. प्रशांत अवसरमल, एम.जी.एम. सचिव श्री अंकुशराव कदम आणि एम.जी. एम हिल्स चे संचालक श्री राजेंद्र रेड्डी व प्राचार्य एन.आर. चव्हाण यांच्या मार्ग दर्शनाखाली जलक्रांतीची शपत घेऊन कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. महात्मा गांधी मिशन संचलित कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, गांधेली (औरंगाबाद) चे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष निवासी शिबीर दि. २१/०/२०१९ ते २७/०२/२०१९ या दरम्यान भिंदोन, औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आले. या विशेष शिबिरामध्ये महाविद्यालयाच्या २५ स्वयंसेवक मुला-मुलींनी सहभाग घेतला. या शिबिरात भारत स्वच्छता अभियान, जल जागृती सप्ताह,दैनंदिन जीवनावर आधारित स्वच्छतेवर व पुलवामा माध्ये झालेल्या हल्ल्याचा निषेध मिरवनुक आणि पथनाट्य सादर केले.

यामध्ये विद्यार्थ्यांनी घरघुती कचरा व सांडपाणीयाचे योग्य व्यवस्थापन केल्याने पसरणारे रोगांबद्दल माहिती दिली. कचऱ्याचे निर्मुलन करणे का गरजेचे आहे आणि ते कशा प्रकारे करावे यावर पथनाट्य सदर केले.रक्तदान शिबीर, कुपोषण निर्मुलन मोहीम, धुम्रपान बंदी, मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबीर, श्रमदानइ. कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच धुम्रपान बंदी, स्वच्छता या विषयांवर स्वयंसेवक विद्यार्थी व विद्यार्थिनीनी ग्रामस्थांमध्ये जनजागृतीचे काम केले.

## रासेयो शिबिराची सुरुवात

दि. २१ फेब्रुवारी, २०१९ रोजी रासेयो शिबिरार्थी गावामध्ये पोहचले.भिंदोन,गांधेली येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानाच्या उद्घाटन प्रसंगी जलक्रांती ग्रुपचे प्रा. प्रशांत अवसरमल, एम.जी.एम. सचिव श्री अंकुशराव कदम आणि एम.जी. एम हिल्स चे संचालक श्री राजेंद्र रेड्डी व प्राचार्य एन आर चव्हाण यांच्या मार्ग दर्शनाखाली जलक्रांतीची शपत घेऊन कार्यक्रमाचा शुभारंभ झाला व तेथील ग्रामस्थांशी व विद्यार्थ्यांची ओळख झाली. तसेच याशिबिरा विषयी ग्रामस्थांना माहिती देण्यात आली. त्यानंतर जिल्हा परिषदेच्या शाळेचा परिसर स्वच्छ करण्यात आला.

## श्रमदान शिबीर व स्वच्छता अभियान

दि. २२ फेब्रुवारी, २०१९ रोजी रासेयो स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांना ग्रामस्वच्छता व श्रमदानाचे महत्व पटवून दिले. या प्रसंगी गावाचे सरपंच श्री. शिंदे व ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी या कार्यक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांनी भिंदोन, गांधेली गावातील सर्व रस्ते व शाळेचा परिसर स्वच्छ केला. यावेळी गावातील गटारी व नाले सफाई करण्यात आली. तसेच दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांनी शाळेची रंग रंगोटी जसे कि शाळेच्या भिंती, झाडांचे खोडे रंगवून सुशोभीकरण करण्यात आले. या मध्ये मिळेल त्या साधनातून जसेकी विटा वापरून रत्याच्या सीमा तयार करण्यात आल्या. यामध्ये मुख्य प्रवेशद्वारापासून वर्ग, कार्यालय, शाळेचे स्वयंपाकगृह असे मार्ग तयार करण्यात आला आणि त्यांना रंग देण्यात आला.

## स्वच्छता व पुलवामा निषेध रैली आणि पथनाट्य

दि. २३ फेब्रुवारी, २०१९ रोजी दैनंदिन जीवनावर आधारित स्वच्छतेवर व पुलवामा माध्ये झालेल्या हल्याची निषेध रॅली मिरवनुक आणि पथनाट्य सादर केले.यामध्ये ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्यासाठी गावामधून प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. या प्रभात फेरीमध्ये भिंदोन,गांधेली येथील शाळेचे विद्यार्थी, रासेयो स्वयंसेवक, स्वयंसेवकांनी व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. तसेच विद्यार्थ्यांनी घरघुती कचरा व सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन न केल्याने पसरणारे रोगांबद्दल माहिती दिली. कचऱ्याचे निर्मुलन करणे का गरजेचे आहे आणि ते कशा प्रकारे करावे यावर पथनाट्य सदर केले.

## स्वच्छता अभियान

दिनांक २४ ते २५ या कालावधीत भिंदोन येथे एम.जी.म. कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या रा.स.यो.स्वयंसेवकंच्या मदतीने गावातील सार्वजनिक मंदिर, मंदिरपरिसरप्राथमिशाळा सांडपाणी, नाल्याची सफाई तसेच स्वच्छता जानजागृती विषयक पाथनाट्य सादर करण्यात आले .तसेच गावकऱ्याच्या मदतीने जमलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचे प्रात्यक्षिक. तसेच माझे गाव या विषयावर आधारित चित्रकला स्पर्धेचे आयोजन  करण्यात आले.

## रक्तदान व आरोग्य तपासणी शिबीर

दि. २६ फेब्रुवारी रोजी एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, गांधेली व एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुणालय यांच्या सयुंक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन प्रसंगीएम.जी.महिल्स चे संचालक डॉ. राजेंद्र रेड्डी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.आर.चव्हाण यांनी विद्यार्थ्यांच्या या स्तुत्य कार्यक्रमाबद्दल कौतुक केले व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी रक्तदान करून रुग्णांचे प्राण वाचविण्याचे आवाहन केले. याप्रसंगी एमजीएम रक्त पेढीचे डॉ. ग्रीष्मा एन. जॉर्ज व डॉ. आशुतोष देव, तसेच एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर

कर्मचारी उपस्थित होते. यावेळी एमजीएम कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ, महाविद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी अशा एकूण ५० रक्तदात्यांनी रक्तदान केले. या शिबिराच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी तसेच महाविद्यालयाचे प्रा.विकास शुक्रे, प्रा.सचिन देसाई, यांनी विशेष प्रयत्न केले. हा कार्यक्रम एमजीएम संस्थेचे सचिव मा. अंकुशराव कदम यांचे प्रेरणेने आयोजित करण्यात आले .

दि. २७ फेब्रुवारी रोजी एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, गांधेली व एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांच्या सयुंक्त विद्यमाने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात गावातील गावकऱ्यांचे आरोग्य तपासणी आणि औषधे पुरवण्यात आले.

## महात्मा गांधी मिशन संचलित कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, गांधेली (औरंगाबाद) च्या सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षा मध्ये राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत आयोजित केलेल्या विशेष निवासी शिबिराची माहिती पुढील प्रमाणे:

महात्मा गांधी मिशन संचलित कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, गांधेली (औरंगाबाद) चे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष निवासी शिबीर दि. २१/०३/२०१८ ते २७/०३/२०१८ या दरम्यान भिंदोन, औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आले. या विशेष शिबिरामध्ये महाविद्यालयाच्या २४ स्वयंसेवक मुला-मुलींनी सहभाग घेतला. या शिबिरात शेतकरी मेळावा, भारत स्वच्छता अभियान, जल जागृती सप्ताह, कुपोषण निर्मुलन मोहीम, धुम्रपान बंदी, मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबीर, श्रमदानइ. कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच धुम्रपान बंदी, स्वच्छता या विषयांवर स्वयंसेवक विद्यार्थी व विद्यार्थिनीनी ग्रामस्थांमध्ये जनजागृतीचे काम केले.

महात्मा गांधी मिशन संचलित कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, गांधेली (औरंगाबाद) चे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष निवासी शिबीर दि. ११/०३/२०१६ ते १७/०३/२०१६ या दरम्यान बोरसर (खु.), ता. कन्नड, जि. औरंगाबाद या खेड्यामध्ये आयोजित करण्यात आले. या विशेष शिबिरामध्ये महाविद्यालयाच्या २५ स्वयंसेवक मुला-मुलींनी सहभाग घेतला. या शिबिरात शेतकरी मेळावा, स्वच्छ भारत अभियान, जल जागृती सप्ताह, कुपोषण निर्मुलन मोहीम, धुम्रपान बंदी, मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबीर, श्रमदान, वृक्षारोपण, पशुधन विकास कार्यक्रमा अंतर्गत असेलेल्या शासकीय योजना व संकारीकाराणाचे फायदे, भारतीय संविधान याविषयी व्याख्याने इ. कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याशिवाय धुम्रपान निषेध दिनानिमित्त फेरीचे आयोजन करण्यात आले. तसेच ''बाल विवाह -एक शाप'' व '' पाणी अडवा-पाणी जिरवा'' या विषयांवर स्वयंसेवक विद्यार्थी व विद्यार्थिनीनी पथनाट्य सादर करून ग्रामस्थांमध्ये त्याविषयी जागृतीचे काम केले.

### रासेयो शिबिराची सुरुवात

दि. ११ मार्च, २०१६ रोजी रासेयो शिबिरार्थी गावामध्ये पोहचले. तेथील ग्रामस्थांशी व विद्यार्थ्यांची ओळख झाली. तसेच याशिबिराविषयी ग्रामस्थांना माहिती देण्यात आली. त्यानंतर जिल्हा परिषदेच्या शाळेचा परिसर स्वच्छ करण्यात आला.

### श्रमदान शिबीर व स्वच्छता अभियान

दि. १२ मार्च २०१५ रोजी रासेयो शिबिराचे उद्घाटन ग्रामस्वच्छता मोहीम राबून करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन गावाचे सरपंच श्री. मारुती गायकवाड यांच्या हस्ते झाले. यावेळी शालेय समितीचे अध्यक्ष श्री भारत गायकवाड, श्री. रतन नरोटे, श्री संतोष गायकवाड, श्री अशोक खंडेलवाल, श्री फुंदे सर, इत्यादी ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी रासेयो स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांना ग्रामस्वच्छता व श्रमदानाचे महत्व पटवून दिले. या कार्यक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांनी बोरसर (खु) गावातील सर्व रस्ते व शाळेचा परिसर स्वच्छ केला. यावेळी गावातील गटारी व नाले सफाई करण्यात आली.

## धुम्रपान निषेध दिनानिमित्त प्रभात फेरी

दि. १३ मार्च २०१६ रोजी जागतिक धुम्रपान निषेध दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी रासेयोच्या विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांना धुम्रपानामुळे होणारे आजार, शरीरावर होणारे अनिष्ट परिणाम याबद्दल माहिती दिली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांना धुम्रपान न करण्याचे आवाहन करून सर्वांनी धुम्रपान न करण्याची शपथ घेतली. यानंतर ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्यासाठी गावामधून प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. या प्रभात फेरीमध्ये बोरसर(खु.) येथील शाळेचे विद्यार्थी, रासेयो स्वयंसेवकांनी व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

## कुपोषण निर्मुलन मोहीम

दि. १४ मार्च २०१६ रासेयो स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी राज्य शासनाच्या कुपोषण निर्मुलन कार्यक्रमात सहभागी होत, अंगण वाडीतील विद्यार्थ्यांची शारीरिक वाढ तपासली आणि घरोघरी जाऊन कुपोषित मुलांच्या मातांना सकस आहाराबद्दल माहिती दिली. तसेच गरोदर महिलांना आहार संबंधी घ्यावयाची काळजी याबद्दल माहिती दिली.

## शेतकरी मेळावा

दि. १५ मार्च २०१६ रोजी बोरसर (खुर्द) येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे डॉ. संजय पाटील (उद्यान विद्या शास्त्रज्ञ, फळ संशोधन केंद्र, हिमायत बाग) औरंगाबाद हे होते. तर अध्यक्ष म्हणुन महाविद्यालयाचे प्राचार्य तथा एमजीएमचे संचालक शिक्षण (कृषी) डॉ. बी. एन. चव्हाण हे होते. यावेळी डॉ. संजय पाटील यांनी भाजीपाला पिके यांची लागवड व व्यवस्थापन या विषयावर माहिती दिली. तसेच त्यांनी शेतकऱ्यांनी गट स्थापन करून आधुनिक पद्धतीने शेती करावी असे आवाहन केले. यावेळी सहाय्यक पशुधन विकास अधिकारी डॉ. आर. व्ही. टोपरे यांनी शेतकर्यांसाठी शासनाच्या उपलब्ध असलेल्या योजना बद्दल माहिती दिली. तसेच महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक निलेश मस्के यांनी ऊस लागवड व पाणी व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले. तर अध्यक्षीय भाषणात डॉ.बी.एन.चव्हाण यांनी शेतकऱ्यांनी ठिबक सिंचनाचा अवलंबकरून पाण्याचा योग्य पद्धतीने वापर करण्याचे आवाहन केले. तसेच बदललेल्या निसर्ग चक्रामुळे सद्यस्थितीमध्ये शेतकऱ्यांनी शेतीबरोबर पशुपालन, दुग्धोत्पादन, रेशीम उद्योग व कुक्कुट पालन यासारखे जोडधंदे करणे गरजेचे असल्याचे नमूद केले.

## आरोग्य तपासणी व उपचार शिबीर

दि. १५ मार्च २०१६ रोजी रासेयो शिबिरात एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, गांधेली व एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने ''मोफत सर्वरोग निदान व उपचार शिबीर'' आयोजित करण्यात आले होते. याशिबिरामध्ये १५० रुग्णांची तपासणी करण्यात आली आणि गरजू रुग्णांना पुढील उपचारासाठी एमजीएम रुग्णालय, औरंगाबाद येथे बोलविण्यात आले.

## जलजागृती सप्ताह

राज्य शासनातर्फे पाण्यासंबंधी समाजामध्ये जागृती व साक्षरता निर्माण करण्यासाठी जागतिक जल दिनाच्या निमित्ताने दि. १६ ते २२ मार्च दरम्यान कृषी विद्यापीठांशी संल्गिन्त महविद्यालायांच्या राष्ट्रीय सेवा योजना एकाकांमार्फत जलजागृती सप्ताह साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले होते. यानिमित्ताने महात्मा गांधी मिशन संचालित कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, गांधेलीच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष निवासी शिबीरामध्ये दि. १६ मार्च रोजी बोरसर (खु.), ता. कन्नड, जि. औरंगाबाद येथे रासेयो स्वयंसेवकांतर्फे जलजागृती सप्ताहाची सुरुवात करण्यात आली. यानिमित्ताने रासेयोच्या विद्यार्थ्यांनी ''पाणी आडवा व पाणी जिरवा'' हे पथनाट्य सादर केले. यामध्ये विद्यार्थ्यांनी शहरी आणि ग्रामीण भागातील घरघुती पाणी वापरासंबंधी भाष्य केले तसेच शेतकऱ्यांसाठी असणाऱ्या योजनांसंबंधी माहिती दिली. याशिबिरा दरम्यान विद्यार्थ्यांनी आधुनिक व पारंपारिक सिंचन पद्धतींचा वापर केल्यामुळे होणारे फायदे व तोटे, पाणी प्रदूषनाचे होणारे परिणाम दर्शविणारे भित्तीपत्रक प्रदर्शनही आयोजित करून शेतकऱ्यांमध्ये जल जागृती केली. तसेच राळेगण सिद्धी (जि. अहमदनगर) येथे श्री. अण्णा हजारे यांनी केलेल्या जल संवर्धन कार्यक्रमाविषयी गावकऱ्यासाठी माहितीपट दाखविला. दि. २२ मार्च रोजी महाविद्यालयामध्ये जागतिक जल दिन साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य तथा एमजीएम चे संचालक शिक्षण (कृषी) डॉ. बी. एन. चव्हाण यांच्या हस्ते जल पूजन करण्यात आले. तसेच महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व इतर कर्मचारी यांनी जलसंवर्धना विषयी प्रतिज्ञा केली.

## सामाजिक कुप्रथा विरोधी जनजागृती मोहीम

दि. १७ मार्च, २०१६ रोजी रासेयोच्या स्वयंसेवकाद्वारे ग्रामस्थांची सद्यस्थितील ज्वलंत सामाजिक प्रश्नाबद्दल जनजागृती करण्याच्या उद्देशाने पथनाट्य सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांनी 'बाल विवाह -एक शाप या विषयावरही पथनाट्य सादर केले.

## शिवार फेरी

रासेयोच्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी शिबीर काळात शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन कांदा, मोसंबी व इतर पिकांबद्दल माहिती घेतली.

## इतर उपक्रम

जिल्हा परिषद पुरस्कृत बालवाडी मध्ये नवीन येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शाळेमार्फत केल्या जाणाऱ्या स्वागत समारंभात राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी बालवाडीत नवीन दाखल झालेल्या विद्यार्थ्यांची त्यांच्या घरापासून शाळेपर्यंत सजविलेल्या बैलगाडीमधून वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात आली.

## समारोप

दि. १७ मार्च, २०१६ रोजी रासेयोच्या स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी बोरसर(खु.) गावाचा परिसर स्वच्छता करून या ७ दिवसाच्या निवासी शिबिराचा समारोप केला. यावेळी ग्रामस्थांनी या शिबिरात आयोजित करण्यात आलेल्या विविध उपक्रमांबद्दल महाविद्यालयाचे व रासेयोच्या स्वयंसेवकांचे कौतुक केले.

## रा से यो माहिती : विद्यापीठाणे मंजूर केलेली स्वयंसेवक संख्या

| शैक्षणिक वर्ष | रासेयो नियमित कार्यक्रम | | | रासेयो विशेष निवासी शिबीर | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण |
| २०१४-१५ | ३३ | १७ | ५० | १२ | ०६ | १८ |
| २०१५-१६ | ३० | २० | ५० | १८ | ०७ | २५ |
| २०१६-१७ | ३९ | ११ | ५० | २० | ०५ | २५ |
| २०१७-१८ | ३३ | १७ | ५० | १८ | ०६ | २४ |
| २०१८-१९ | ३० | २० | ५० | १४ | ११ | २५ |

## रा से यो माहिती : नियमित कार्यक्रम अंतर्गत राबविलेले विविध उपक्रम

| उपक्रम | शिबीर संख्या / लाभार्थी संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ |
| आरोग्य विषयक शिबीर | ०१ / १८० | ०१/१५० | ०१ / १२७ | -- | ०२/१५० |
| पल्स पोलिओ अभियान | ०२ / १५० | ०२/१२५ | ०२ / ११० | ०२ / १२५ | --- |
| रक्तदान शिबीर | ०२ / ५३ | ०२/५९ | ०१ / २३ | ०१ / ६९ | ३/१२१ |
| आपत्ती व्यवस्थापन | ०१ / ३०० | ०१ / २०० | ०१ / २१० | -- | १/१०० |
| वृक्ष दिंडी / वृक्षारोपण | ०३ / २०० | ०४/३५० | ०४ / २०० | ०१ / ५० | ४/४०० |
| शेतकरी मेळावा | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०२ |
| स्वच्छता अभियान | ०२ | ०२ | ०२ | ०२ | ०४ |

## एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, गांधेली येथे रक्तदान शिबिराचे आयोजन

महात्मा गांधी मिशनच्या ३६ व्या वर्धापन दिनानिमित्त दि. २० डिसेंबर रोजी एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, गांधेली व एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांच्या सयुंक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन प्रसंगी एमजीएमचे संचालक शिक्षण (कृषी) तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.आर.चव्हाण यांनी विद्यार्थ्यांच्या या स्तुत्य कार्यक्रमाबद्दल कौतुक केले व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी रक्तदान करून रुग्णांचे प्राण वाचविण्याचे आवाहन केले. याप्रसंगी एमजीएम रक्त पेढीचे डॉ. ग्रीष्मा एन. जॉर्ज व डॉ. आशुतोष देव, तसेच एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी एमजीएम कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ, महाविद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी अशा एकूण ५० रक्तदात्यांनी रक्तदान केले. या शिबिराच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी तसेच महाविद्यालयाचे प्रा..विकास शुक्रे ,प्रा.सचिन देसाई व प्रा. अतुल सरपाले यांनी विशेष प्रयत्न केले. हा कार्यक्रम एमजीएम संस्थेचे सचिव मा. अंकुशराव कदम यांचे प्रेरणेने आयोजित करण्यात आले

## एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या रासेयोतर्फे शिंदोन तांडा येथे स्वच्छता अभियान

महात्मा गांधी मिशन संचालित, गांधेली येथील कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत शिंदोन तांडा, गांधेली जि. औरंगाबाद हे गाव दत्तक घेण्यात आले आहे. या अंतर्गत महाविद्यालयाच्या रासेयो एकका तर्फे या गावात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते . शिंदोन तांडा, गांधेली येथे 'स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या

अभियानाच्या उद्घाटन प्रसंगी गावचे सरपंच श्री. मोहन शिंदे विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या अभियाना दरम्यान रासेयो स्वयंसेवकांनी गावातील रस्त्यांची स्वच्छता केली, तसेच विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून घरघुती कचरा व सांडपाणी याचे योग्य व्यवस्थापन न केल्याने पसरणारे रोगांबद्दल उपस्थितांना माहिती दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन.आर. चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक प्रा.विकास शुक्रे यांनी ग्राम स्वच्छता अभियान हा कार्यक्रम राबविला.

## एमजीएम गांधेली परिसरात ७० वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

दिनांक २६ जानेवारी २०१९ रोजी महात्मा गांधी मिशनच्या गांधेली परिसरातील कृषी जैवतंत्रज्ञान, अन्नतंत्रज्ञान, नानासाहेब कदम कृषी महाविद्यालय व कृषी विज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने नानासाहेब कदम कृषी महाविद्यालयाच्या प्रांगणात संस्थेचे सचिव श्री. अंकुशराव कदम यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले या प्रसंगी डॉ.रेड्डी, श्री.डी.एस. कदम, श्री.भा.ध. पिंटेवार, डॉ उन्मेश कदम, अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. र. वि. काळे .नानासाहेब कदम कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. के. पांडे व कृषी जैव तंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. आर.चव्हाण, कृषी विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. एन.एम.मस्के हे उपस्थित होते. या वेळी तिन्ही महाविद्यालयाच्या विद्यार्थांनी पथसंचलन करून ध्वजवंदना दिली तसेच विद्यार्थांनी देशभक्तीपर गीत, समूहगीत, मुकाभिनय, समूहनृत्य इत्यादी कार्यक्रम सादर केले. या कार्यक्रमासाठी सर्व महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

## एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय युवा दिन उत्साहात साजरा

महात्मा गांधी मिशन संचालित, गांधेली येथील कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय युवा दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ''राष्ट्रीय युवा दिन'' हा स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त देशभरात साजरा केला जातो. या प्रसंगी एकविसाव्या शतकातील युवकां पुढील आव्हाने या विषयावरती निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमा मध्ये प्रमुख पाहुणे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. आर. चव्हाण हे होते. याप्रसंगी ऋषिकेश तहकिक, प्रतिक धवस आणि प्रथमेश खांडेकर या विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. एन. आर. चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना गुणवत्ता, उत्साह, शक्ती यासोबतच विवेकबुद्धीचा प्रत्येक बाबीत उपयोग करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालायाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रा. विकास शुक्रे व प्रा. सचिन देसाई यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, गांधेली येथे हुतात्मा दिन साजरा

दिनांक ३० जानेवारी २०१९ रोजी महात्मा गांधीजींच्या ७१ व्या पुण्यतिथी निमित्त महात्मा गांधी मिशन संचालित कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, गांधेली येथे ''हुतात्मा दिन'' पाळण्यात आला. या निमित्ताने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन.आर.चव्हाण यांच्या हस्ते महात्मा गांधीजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला व दोन मिनिटांचे मौन पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा

प्रसिध्द भारतीय नोबेल पारितोषिक विजेते भौतिकी शास्त्रज्ञ सर सी.व्ही. रमन, यांनी त्यांच्या जगप्रसिद्ध प्रकाश विकिरण संबंधी शोधाची घोषणा दि. २८ फेब्रुवारी १९२८ रोजी केली असल्याने भारतात हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. राष्ट्रीय विज्ञान दिवसाचा मुळ उद्देश तरुण विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी आवड निर्माण व्हावी, समाजामध्ये विज्ञान विषयी जागरूकता निर्माण व्हावी व वैज्ञानिक दृष्टीकोन वाढीस लागावा हा आहे. यानिमित्ताने महात्मा गांधी मिशन संचालित कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, गांधेली येथे राष्टीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी मानवाची वैज्ञानिक दृष्टीकोनातून झालेली वाटचाल याविषयी रांगोळीद्वारे चित्रे काढून माहिती दिली. यामध्ये द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनी कु. पूजा सुरुडकर कु. स्वाती वामन व कु. कांचन मापारी यांनी रांगोळीद्वारे चित्रे काढली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.आर. चव्हाण यांनी विद्यार्थ्यांकडून या रांगोळी विषयी माहिती घेतली आणि मानवाच्या प्रगतीमध्ये शेती शास्त्राचे महत्व त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

## एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयामध्ये मराठी भाषा दिन साजरा

दिनांक २७ फेब्रुवारी २०१८ हा दिवस मराठी साहित्याचे मानदंड वि. वा. शिरवाडकर यांचा जन्म दिवस जागतिक मराठी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने महात्मा गांधी मिशन संचालित कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, गांधेली येथे राष्टीय सेवा योजनेच्या माध्यमातून भित्तीपत्रक प्रदर्शन करून मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. अश्विनीकुमार क्षीरसागर यांच्या हस्ते झाले. या प्रदर्शना मध्ये विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचा इतिहास, मराठी भाषा समृद्ध करणारे लेखन, साहित्य व इतर कलाकृती, तसेच मराठी साहित्यकार इत्यादींची माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी कविता वाचनही केले. यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ. अश्विनीकुमार यांनी यावेळी प्रत्येकाने मराठी साहित्य वाचण्याचा आग्रह केला. यावेळी महाविद्यालयाचे प्रा.विकास शुक्रे, प्रा. सचिन देसाई, प्रा.विजय देशमुख, डॉ. अशोक खर्डे व महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

## एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयामध्ये निबंध स्पर्धाचे आयोजन

महात्मा गांधी मिशन संचालित, गांधेली येथील कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयामध्ये दिनांक ०२ फेब्रुवारी रोजी निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती या कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुणे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.आर.चव्हाण हे होते. ३५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता याप्रसंगी सावंत पेरणा, आरती मांडलिक अवंतिका नांदुरकर प्रविण मोरे प्रतिक धवस भारतामध्ये जर महात्मा गांधी असते तर हैड्रोपोनिक, वंडरग्रास ग्रीनवॉल व २१ व्या शतकातील तरुण या विषयावर विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले.

## महाविद्यालयाच्या परिसरात व संलग्न प्रक्षेत्रावर केलेली वृक्ष लागवड

महात्मा गांधी मिशन संचालित एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय,गांधेली प्रत्येक वर्षी विविध प्रसंगी नियमीत पणे वृक्षारोपण करते. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी व कर्मचार्यांनी महाविद्यालयाच्या प्रक्षेत्रावर दि. १६/०६/२०१६ व दि. ०१/०७/२०१६ रोजी अनुक्रमे वर्षामंगल व कृषी दिनानिमित्त ३०० झाडे लागवड करण्यात आली. ‘‘एक जीवन’’ हे महावृक्षारोपण अभियान राबविण्यात आले. या अभियानात २५ वेगवेगळ्या संस्थानी सहभाग घेतला. या अभियानामध्ये महाराष्ट्र राज्याचे विधानसभा अध्यक्ष मा. श्री. हरिभाऊ बागडे, मा. आमदार श्री. अतुल सावे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती विजया रहाटकर, माजी. आमदार श्री. कल्याण काळे व श्री.नामदेव पवार, औरंगाबाद महानगर

पालिकेचे महापौर श्री. त्र्यंबक तुपे व इतर पदाधिकारी,तसेच एमजीएमचे सचिव श्री. अंकुशराव कदम, कृषिभूषण श्री. विजय अण्णा बोराडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एन. चव्हाण, नानासाहेब कदम कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एस. शिंदे, अन्नतंत्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. बी. रोडगे व विद्यार्थी यावेळी उपस्थित होते. या महावृक्षारोपण कार्यक्रमात एकूण ३७६५ झाडांची लागवड करण्यात आली. याशिवाय महाविद्यालयातील विद्यार्थी व कर्मचार्यांनी दि.१०/०७/२०१६ ते ०५/०९/२०१६ पर्यंत एकूण ४८५९ झाडे लावलीत. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये एकूण ९०७४ झाडांची लागवड करण्यात आली.

## पोलीस आरोहण दिनानिमित्त एमजीएम कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे पथनाट्य

महाराष्ट्र पोलीस आरोहण दिनानिमित्त सूर्या लान्स येथे झालेल्या पोलीसमित्र व महिला जनजागृती मेळाव्यामध्ये एमजीएम कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालय, गांधेलीच्या विद्यार्थ्यांनी स्त्रीभ्रूणहत्या - एकशाप या विषयावरती पथनाट्य सादर केले. ०६ जानेवारी २०१६ रोजी पोलीस आरोहण दिन व महिला मेळाव्या मध्ये स्त्री भ्रूण हत्या याविषयावर पथनाट्य सादर करताना रासेयोचे विद्यार्थी

## एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, गांधेली, औरंगाबाद

**एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराची ग्रामस्वच्छता अभियानाने सुरुवात**

महात्मा गांधी मिशन संचालित कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, गांधेलीचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष निवासी शिबीर दि. ११ मार्च ते १७ मार्च २०१६ दरम्यान मौजे बोरसर (खु.), ता. कन्नड, जि. औरंगाबाद येथे आयोजित करण्यांत आलेले आहे. या शिबिराचे उद्घाटन बोरसर (खु.) चे सरपंच मा. श्री. मारुतीअप्पा गायकवाड यांच्या हस्ते झाले.

## एम जी एम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय युवक दिनाचे आयोजन

स्वामी विवेकानंद जयंती निमित्त दिनांक १२ जानेवारी रोजी राष्ट्रीय युवक दिन एमजीएम कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालय, गांधेली येथे साजरा करण्यात आला. या निमित्ताने निबंध स्पर्धा, प्रश्नमंजुषा आदी कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमाअंतर्गत स्नेहल इंगळे या विद्यार्थ्याने बनविलेली भारतातील प्रज्ञावंत युवक ही चित्रफित दाखविण्यात आली. तसेच सतीश काळवाघे, राम सिनगारे व जयश्री देसले या विद्यार्थ्यांनी युवकदिनानिमित्त आपले विचार मांडले.

# सात दिवसीय शिबिराचा आराखडा

**एम.जी.एम. कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या रा.से.यो. तर्फे भिंदोन येथे घेण्यात आलेल्या सात दिवसीय निवासी विशेष शिबाराचा शुभारंभ व स्वच्छता अभियान**

## उदघाटन समारंभ

महात्मा गांधी मिशन संचलित, गांधेली येथील कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर भिंदोन गांधेली जि. औरंगाबाद येथे २१ फेब्रूवारी रोजी उद्घाटन झाले व गाव दत्तक घेण्यात आले आहे. या अंतर्गत महाविद्यालयाच्या रा.से.यो. एकका तर्फे या गावात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भिंदोन, गांधेली येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानाच्या उद्घाटन प्रसंगी जलक्रांती ग्रुपचे प्रा. प्रशांत अवसरमल, एम.जी.एम. सचिव श्री अंकुशराव कदम आणि एम.जी.एम हिल्स चे संचालक डॉ. राजेंद्र रेड्डी यांच्या मार्ग दर्शनाखाली जलक्रांतीची शपथ घेऊन कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

## शाळेची स्वच्छता आणि कचरा निर्मुलीकरण

पहिल्या दिवशी शाळेचा व तेथील परिसर स्वच्छ केला. या मध्ये शाळेच्या पत्र्यांवरील कचरा , परिसरातील कचऱ्याचे व झाडांच्या पाला पाचोळ्याचे व्यावस्तापन करून परिसर स्वच्छकरण्यात आला.कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन व्हावे म्हणून शोष खड्डे खादले.

## शाळेतील सुशोभीकरण

पुढील दिवशी विद्यार्थ्यांनी शाळेच्या भिंती, झाडांचे खोडे रंगवून सुशोभीकरण करण्यात आले.

## शाळेच्या मैदाना वरती रस्ता तयार करणे

या मध्ये प्रांगणातील विटांचा वापर करुन रस्ता तयार करण्यात आला. त्यात मुख्य प्रवेशद्वारापासून वर्ग, कार्यालय, शाळेचे स्वयंपाकगृह असे मार्ग तयार करण्यात आले आणि त्यांना रंग देण्यात आला.

## स्वच्छता व पुलवामा निषेध रॅली व पथनाट्य

दैनंदिन जीवनावर आधारित स्वच्छतेवर व पुलवामा मध्ये झालेल्या हल्लूयाची निषेध रॅली आणि पथनाट्य सादर केले. यामध्ये विद्यार्थ्यांनी घरघुती कचरा व सांडपाणीयाचे योग्य व्यवस्थापन न केल्याने पसरणाऱ्या रोगांबद्दल माहिती दिली. कचऱ्याचे निर्मुलन करणे का गरजेचे आहे आणि ते कशा प्रकारे करावे यावर पथनाट्य सदर केले.

## सुशोभीकरण

दिनांक २४ ते २५ या कालावधीत भिंदोन येथे एम.जी.एम. कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या रा.स.यो. स्वयंसेवकांच्या मदतीने गावातील सार्वजनिक मंदिर, मंदिर परिसर प्राथमि शाळा सांडपाणी, नाल्याची सफाई तसेच स्वच्छता जानजागृती विषयक पाथनाट्य सादर करण्यात आले .तसेच गावकऱ्याच्या मदतीने जमलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचे प्रात्यक्षिक. तसेच माझे गाव या विषयावर आधारित चित्रकला स्पर्धेचे नियोजन करण्यातआले.

## रक्तदान शिबीर

दि. २६ फेब्रुवारी रोजी एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, गांधेली व एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांच्या सयुंक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन प्रसंगी एम.जी.एम हिल्स चे संचालक डॉ. राजेंद्र रेड्डी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. आर. चव्हाण यांनी विद्यार्थ्यांच्या या स्तुत्य कार्यक्रमाबद्दल कौतुक केले व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी रक्तदान करून रुग्णांचे प्राण वाचविण्याचे आवाहन केले. याप्रसंगी एमजीएम रक्त पेढीचे डॉ. ग्रीष्मा एन. जॉर्ज व डॉ. आशुतोष देव, तसेच एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी एमजीएम कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ, महाविद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी अशा एकूण ५० रक्तदात्यांनी रक्तदान केले. या शिबिराच्या यशस्वितातेसाठी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी तसेच महाविद्यालयाचे प्रा.विकास शुक्रे, प्रा.सचिन देसाई, यांनी विशेष प्रयत्न केले. हा कार्यक्रम एमजीएम संस्थेचे सचिव मा. अंकुशराव कदम यांचे प्रेरणेने आयोजित करण्यात आले.

## आरोग्य तपासणी

दि. २६ फेब्रुवारी रोजी एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, गांधेली व एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांच्या सयुंक्त विद्यमाने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात गावातील गावकऱ्यांचे आरोग्य तपासणी आणि औषधे पुरवण्यात आले.

## समारोप

दिनांक २७ फेबुवारी रोजी भिंदोन येथे श्रीमती आशाबाई बद्रीनाथ शिंदे यांनी , ''शेतीत कमी भांडवल खर्च करून जास्तीत जास्त उत्पन्न कसे घेता येईल'' याचे तंत्र शिकून घ्या असे आव्हान सदर कार्यक्रमात केले . हे शिबीर एम.जी.एम. हिल्स चे संचालक डॉ. राजेंद्र रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. या साठी एम.जी.एम. कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यलयचे प्राचार्य डॉ. एन.आर.चव्हाण, रा.स.यो. स्वयंसेवक आणि महाविद्यालयाचे प्रा. विकास शुक्रे, प्रा. सचिन देसाई यांनी परिश्रम घेतली.

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरातील ठळक छायाचित्रे



एम.जी.एम. कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या रा.से.यो. विशेष शिबीर भिंदोन येथे २१फेब्रुवारी रोजी उद्घाटन करण्यात आले.




स्वच्छता व पुलवामा निशेष रैली



स्वच्छता रैली



स्वच्छता आणि कचरा निर्मूलीकरण करतांना रासयोचे विद्यार्थी



स्वच्छता आणि कचरा निर्मूलीकरण करतांना रासयोचे विद्यार्थी



जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर तयार करण्यात येत असतांना



जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर तयार केलेला मार्ग

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरातील ठळक छायाचित्रे



रा.स.यो. अंतर्गत महाविद्यालयात आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन



रा.स.यो. अंतर्गत महाविद्यालयात आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन



आरोग्य तपासणी करतांना वैद्यकिय अधिकारी




आरोग्य तपासणी करतांना वैद्यकिय अधिकारी



रक्त दान करतांना गावातील गावकरी



रक्त दान करतांना गावातील गावकरी

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरातील ठळक छायाचित्रे



एमजीएम कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय,
गांधेली येथे रक्तदान शिबिर



स्वच्छतेची शपथ घेतानां विद्यार्थी व प्राध्यापक वर्ग




स्वच्छतेची शपथ घेताना विद्यार्थी व प्राध्यापक वर्ग



स्वच्छतेचे महत्व पटवून देणारे व स्त्रीभ्रूण हत्या
या विषयावर पथनाट्य सादर करतांना रासेयोचे विद्यार्थी





स्वच्छतेचे महत्व पटवून देणारे व स्त्रीभ्रूण हत्या या विषयावर पथनाट्य सादर करतांना रासेयोचे विद्यार्थी

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरातील ठळक छायाचित्रे



एमजीएम गांधेली परिसरात
७० वा प्रजासत्ताक दिन
उत्साहात साजरा करतांना विद्यार्थी



एमजीएम गांधेली परिसरात
७० वा प्रजासत्ताक दिन
उत्साहात साजरा करतांना विद्यार्थी



एमजीएम गांधेली परिसरात
७० वा प्रजासत्ताक दिन
उत्साहात साजरा करतांना विद्यार्थी



अंतरराष्ट्रीय योगा दिन
साजरा करतांना रासेयो स्वयंमसेवक

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरातील ठळक छायाचित्रे



वृक्षारोपन करतांना एमजीएम चे सचिव मा.श्री. अंकुशराव कदम



वृक्षदिंडीची पुजा करतांना एमजीएमचे सचिव मा.श्री. अंकुशराव कदम







वृक्षदिंडीत सहभागी झालेले रासेयो स्वयंमसेवक तथा विद्यार्थी



वृक्षदिंडी

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरातील ठळक छायाचित्रे



जागतिक जल दिनानिमित्त जलसंवर्धनाची शपथ घेतांना उपस्थित ग्रामस्थ व रासेयो स्वयंसेवक



जनावरांच्या लसीकरण शिबीरात सहभागी ग्रामस्थ व रासेयो स्वयंसेवक



जागतिक जल दिनानिमित्त जलसंवर्धनाची शपथ घेतांना उपस्थित प्राध्यापक, कर्मचारी व रासेयो स्वयंसेवक



धुम्रपान निषेश दिनानिमित्त काढण्यात आलेली प्रभात फेरी.



पल्स पोलियो अभियानावेळी शासकीय कर्मचाऱ्यांना मदत करतांना रासेयो स्वयंसेवक



ग्राम स्वच्छता अभियानामध्ये स्वच्छता करतांना रासेयो स्वयंसेवक



ग्राम स्वच्छता अभियानामध्ये स्वच्छता करतांना रासेयो स्वयंसेवक




वर्षामंगल निमित्त आयोजित रक्तदान शिबिरात सहभागी रासेयो स्वयंसेवक

## NSS Special Camp : Bhindone, Duration : 2018-19

| Sr.No. | Reg.No. | Name of the student |
|---|---|---|
| 1 | 2016BTGD02 | Ambhore B.V. |
| 2 | 2016BTGD04 | Bakshi P.N. |
| 3 | 2016BTGD13 | Chavan A.V. |
| 4 | 2016BTGD29 | Ghanwat P.S. |
| 5 | 2016BTGD43 | Khetre S.S. |
| 6 | 2016BTGD45 | Kshirsagar A.U. |
| 7 | 2016BTGD46 | Kshirsagar R.C. |
| 8 | 2016BTGD48 | Lahane A.A. |
| 9 | 2016BTGD50 | Mali A.S. |
| 10 | 2016BTGD51 | Mande S.S. |
| 11 | 2016BTGD54 | Narale P.R. |
| 12 | 2016BTGD55 | Navalkele K.V. |
| 13 | 2016BTGD60 | Phasate B.N. |
| 14 | 2016BTGD62 | Purhe Y.S. |
| 15 | 2016BTGD74 | Tambe D.V. |
| 16 | 2016BTGD75 | Tapse S.I. |
| 17 | 2016BTGD77 | Thorat Y.B. |
| 18 | 2016BTGD80 | Yermalwar S.D. |
| 19 | 2016BTGD71 | Solapure V.N. |
| 20 | 2016BTGD32 | Gite O.P. |
| 21 | 2016BTGD42 | Khelge P.R |
| 22 | 2017BTGD17 | Hiwale C.H. |
| 23 | 2017BTGD08 | Chavan U.S |
| 24 | 2017BTGD53 | Pawar S.V. |
| 25 | 2017BTGD32 | Mindhar A.P. |

Total Participated Volunteers: 25, Male: 14 and Female: 11.

## NSS Special Camp : Bhindone, Duration : 2017-18

| Sr.No. | Reg.No. | Name of the student |
|---|---|---|
| 1 | 2015/01 | Bacchewar Sumit Sainasth |
| 2 | 2015/02 | Bhoge Vijay Bhujang |
| 3 | 2015/03 | Borde Bhagwan Vishnu |
| 4 | 2015/07 | Chole Amol Udhav |
| 5 | 2015/08 | Choughule Namadev Prakash |
| 6 | 2015/09 | Dange Kirti Suresh |
| 7 | 2015/26 | Jadhav Umesh Appaso |
| 8 | 2015/31 | Jadhav Bhagyashri Manohar |
| 9 | 2015/27 | Jadhav Vishnu Gambhirrao |
| 10 | 2015/34 | Lakkas Yogesh Ganesh |
| 11 | 2015/36 | Mahale DaminiDilip |
| 12 | 2015/40 | Modhave Shubham Sopan |
| 13 | 2015/41 | MundheMaroti Sudhakar |
| 14 | 2015/42 | Mundhe Vishnu Vitthal |
| 15 | 2015/46 | Navathar Avinash Vishnu |
| 16 | 2015/48 | Padol Rupali Appasaheb |
| 17 | 2015/53 | Pattam Payal Rajeshwar |
| 18 | 2015/54 | Phatangare Satyam Ashok |
| 19 | 2015/56 | Rasal Vishal Rajendra |
| 20 | 2015/62 | Shendge Ajit Satish |
| 21 | 2015/66 | Sonsale Kailas Dhondiba |
| 22 | 2015/71 | Thakare Prathmesh Gajanan |
| 23 | 2015/73 | Thombre Saroja Dnyaneshwar |
| 24 | 2015/79 | Yashwante Krushna Kaduba |

Total Participated Volunteers: 24, Male: 18 and Female: 06.

## NSS Special Camp: Borsar (Kh.), Tal.: Kannad, Duration: 2016-17

| Sr. No. | Reg. No. | Name of the Student |
|---|---|---|
| 1 | 2014/13 | Damre Akash Shankar |
| 2 | 2014/14 | Deokar Devayani Dattatray |
| 3 | 2014/21 | Gangurde Ganesh Raghunath |
| 4 | 2014/37 | Kasimalla Premkumar Nageshwarrrao |
| 5 | 2014/38 | Kale Sachin Prabhakar |
| 6 | 2014/48 | Madastu Saikrishna Ashok |
| 7 | 2014/50 | Mangate Ganesh Dilip |
| 8 | 2014/56 | Palodkar Sumit Sanjay |
| 9 | 2014/60 | Peddi Priyanka Yidhyanand |
| 10 | 2014/63 | Rachewad Sandeep Satyanarayan |
| 11 | 2014/69 | Shebe Sanjivani Kishor |
| 12 | 2014/74 | Thakur Roshan Suresh |
| 13 | 2014/09 | Chaudhari Uddhav Kakaro |
| 14 | 2014/18 | Doiphode Akash Diliprao |
| 15 | 2014/23 | Gaurudi Dinesh Ganesh |
| 16 | 2014/31 | Ingole Shraddha Ramkrishna |
| 17 | 2014/32 | Jadhav Darshani Digambar |
| 18 | 2014/43 | Khamat Bhausaheb Tukaram |
| 19 | 2014/44 | Kikrale Ritesh Pralhad |
| 20 | 2014/66 | Salunke Ajay Ashok |
| 21 | 2015/64 | Shinde Akash Tanaji |
| 22 | 2015/69 | Tahakik Rushikesh Ravindta |
| 23 | 2015/76 | Wagh Sudarshan Nivrutti |
| 24 | 2015/77 | Waghule Gopal Gulab |
| 25 | 2015/80 | Yelikar Rushikesh Sunil |

Total Participated Volunteers : 24, Male : 18 and Female : 06

## NSS Special Camp: Borsar (Kh.), Tal.: Kannad, Duration: 2015-16

| Sr. No. | Reg. No. | Name of the student |
|---|---|---|
| 1 | 2013/02 | Umbarekar R.S. |
| 2 | 2013/07 | Bind M.R. |
| 3 | 2013/08 | Chaudhari A.A. |
| 4 | 2013/09 | Chaudhari C.N. |
| 5 | 2013/14 | Desale J.R. |
| 6 | 2013/16 | Devabhakthini N.N. |
| 7 | 2013/28 | Gavhane G.B. |
| 8 | 2013/32 | Gingine P.T. |
| 9 | 2013/38 | Kadam M.S. |
| 10 | 2013/39 | Kadam R.K. |
| 11 | 2013/40 | Kadam M.S. |
| 12 | 2013/43 | Kanade M.R. |
| 13 | 2013/46 | Kharche A.R. |
| 14 | 2013/47 | Khedkar S.T. |
| 15 | 2013/48 | Kotgire N.M. |
| 16 | 2013/53 | Mengeade R.R. |
| 17 | 2013/55 | Mulik P.U. |
| 18 | 2013/65 | Patole B.R. |
| 19 | 2013/66 | Pimple P.A. |
| 20 | 2013/69 | Raut S.B. |
| 21 | 2013/73 | Shinde S.R. |
| 22 | 2013/78 | Talekar L.M. |
| 23 | 2014/13 | Damre A.S. |
| 24 | 2014/21 | Gangurde G.R. |
| 25 | 2014/50 | Mangate G.D. |

Total Participated Volunteers: Male: 18 and Female: 7.

### NSS Special Camp: Borsar (Kh.), Tal.: Kannad, Duration: 2015-16

| Sr. No. | Reg. No. | Name of the Student |
|---|---|---|
| 1 | 2011/16 | Diware R.A. |
| 2 | 2011/25 | Jadhav V.N. |
| 3 | 2011/38 | Mankar G.N. |
| 4 | 2011/55 | Sable A.D. |
| 5 | 2011/73 | Surye S.N. |
| 6 | 2012/04 | Ambhore P.J. |
| 7 | 2012/09 | Bobade J.M. |
| 8 | 2012/10 | Chavan R.N. |
| 9 | 2012/21 | Ghumare S.P. |
| 10 | 2012/35 | Katkare K.R. |
| 11 | 2012/40 | Khedkar K.R. |
| 12 | 2012/43 | Kute V.K. |
| 13 | 2012/54 | Pawar S.D. |
| 14 | 2012/55 | Potdar H.S. |
| 15 | 2012/58 | Rathod R.P. |
| 16 | 2012/66 | Sable P.K. |
| 17 | 2013/43 | Kanade M.R. |
| 18 | 2013/02 | Umbarkar R.S. |

Total Participated Volunteers : Male : 12 and Female : 6

रविवार. १६ मार्च, २०१४
औरंगाबाद.

# दिव्य मराठी

फोन - (०२४०) ३९८७४७६, जितेंद्र जोशी - ७५०७७७७२०४, रविकांत गंगावणे - ८३१०९०९८५८.

**संमिश्र** | रविवार. १६ मार्च २०१४ औरंगाबाद.

## अमळनेर येथील शाळेत एमजीएमतर्फे आरोग्य शिबिर

गंगापूर | कायगावजवळील अमळनेर वस्ती येथील जिल्हा परिषद प्रशालेत एमजीएमतर्फे नागरिकांसाठी मोफत सर्वरोगनिदान व उपचार आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ग्रामस्थ व विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात येऊन उपचार करण्यात आले. एमजीएमचे डॉ. विजयकुमार देसरडा, प्राचार्य बी. एन. चव्हाण, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. ए. व्ही. खर्डे, विक्रम कदम यांच्यासह रासेयोच्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रम यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

## भिंदोन येथील सात दिवसीय निवासी 'रा.स.यो' शिबिराची कार्यपूर्ती



गांधीली /प्रतिनिधी

युवकांचे प्रभावी व्यक्तिमत्त्व घडविण्याचे कार्य शिक्षण क्षेत्राद्वारे होत असताना दिसत आहे. प्रभावी व्यक्तिमत्त्व घडवत असताना तरुणांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाण व सेवाभाव निर्माण करण्याचे कार्य महाविद्यालयीन स्तरावर राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाद्वारे होत आहे. महात्मा गांधी मिशन कृषी जैव तंत्रज्ञान महाविद्यालयातर्फे दिनांक दि.२१/२/२०१९ ते २७/ ०२/२०१९ या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर संपन्न झाले. शिबिराचा शुभारंभ दिनांक २१ फेब्रुवारी रोजी जलक्रांती ग्रुपचे प्रा प्रशांत अवसरमल यांच्या उपस्थितीत एम जीएमचे सचिव श्री अंकुशराव कदम आणि एमजीएम हिल्सचे संचालक श्री. राजेंद्र रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली जलक्रांतीची शपथ घेऊन करण्यात आला. यावेळी कोणत्याही देशाच्या विकासासाठी जलक्रांतीची अतिशय गरज असून देशाचे भवितव्य उज्वल हवे असेल तर प्रथम आपल्या युवकांना अधिक सक्षम व सामर्थ्यवान बनवणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन जलक्रांती ग्रुपचे प्रा प्रशांत अवसरमल यांनी केले. यानंतर दिनांक २२ आणि २३ जानेवारी रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील दस्तऐवज, स्टोअरची स्वछता मोडके फर्निचर इ. व्यवस्थित करून स्वछ करण्यात आली तसेच इमारत व आजूबाजूच्या परिसराची स्वच्छता आणि परिसराचे सुशोभीकरण करण्यात आले २४ ते २५ या कालावधीत भिंदोन एमजीएम. कृषी जैव तंत्र महाविद्यालयाच्या रा. स. यो. स्वयंसेवकांच्या मदतीने गावातील सार्वजनिक मंदिर, मंदिर परिसर प्राथमिक शाळा, सांडपाणी नाल्याची सफाई तसेच प्रथमेश बक्षी भक्ती फसते,स्वप्नील ऐश्वर्या माली यांनी स्वछता जनजागृती विषयक पथनाट्य सादर करण्यात आले तसेच गावकऱ्यांच्या मदतीने जमलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचे प्रात्यक्षिक आणि चंदू हिवाळे,सोनाली कगरे अंजली राठोड,बोदर श्रीकांत यांनी माझा गाव विषयावर आधारित चित्रकला स्पर्धाचे नियोजन केले. २१ फेब्रुवारी पासून सुरू असलेल्या रा.से.यो. शिबिराचा २७ फेब्रुवारी २०१९ रोजी समारोप झाला. स्वयंसेवकांना या शिबिरात आलेले अनुभव भावी आयुष्यात यशस्वी जीवन जगण्यासाठी नक्कीच उपयोगी ठरतील, असे उद्गार डॉ. राजेंद्र रेड्डी (संचालक गांधेली हिल्स) महाविद्यालय प्रत्येक उपक्रम खूपच आत्मीयतेने आणि प्रामाणिकपणे राबवत असते असे गौरवोद्गारही त्यांनी याप्रसंगी काढले. ग्रामीण भागात रा.से.यो.च्या माध्यमातून जी कामं केली जातात ती ग्रामविकासाचे द्योतक ठरतात तेव्हा स्वयंसेवकांनी स्वतःला झोकून देऊन रा.से.यो.मधील उपक्रमात सहभाग नोंदवायला हवा असे आवाहन याप्रसंगी सरपंचप आशाबाई शिंदे यांनी केले याप्रसंगी यतींद्र थोरात,प्रतीक्षा घनवट स्नेहल यरमलवर यांच्यासह रा.से.यो. स्वयंसेवकांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्ष म्हणून उपस्थित प्राचार्य यांनी ग्रामीण भागाचा विकास हाच रा.से.यो.चा सेवाभाव असतो, असे प्रतिपादन केले. रा.से.यो. च्या माध्यमातून आम्ही ग्रामस्थांसाठी तसेच विद्यार्थ्यांसाठी जे अनेकविध उपक्रम राबवतो त्यामागे समाजाला विधायक वळण देणा-या विचारांची पेरणी युवकांमध्ये करता यावी हा प्रामाणिक हेतू असतो, अशी माहिती यांनी दिली. दत्तकग्राम भिंदोन येथे शिबिराच्या माध्यमातून सात दिवस विद्यार्थ्यांनी श्रमदान करून शोषखड्डे खोदले व ग्रामस्थांची सांडपाण्याची समस्या दूर केली, रस्ते नाल्यांची सफाई केली. हगणदारीमुक्त गाव, स्त्री-पुरूष समानता, स्वच्छ भारत अभियान आदी विषयांवर प्रभातफेरीच्या माध्यमातून तसेच घरोघरी जाऊन जनजागृती केली. विद्यार्थ्यांवर संस्कार व्हावे यासाठी विविध विषयावर विचारवंतांची व्याख्याने आयोजित करण्यात आली. सायंकालीन सत्रामध्ये गावकऱ्यासाठी विविध प्रबोधनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आले. २७ फेब्रुवारी रोजी भिंदोन येथे श्रीमती आशाबाई बद्रीनाथ शिंदे सरपंच,भिंदोन शेतीत मोठा भांडवली खर्च करून उत्पन्न घेण्यापेक्षा कमी खर्चात अधिकाधिक उत्पन्न कसे घेता येईल, याचे तंत्र शेतकऱ्यांनी जाणून घेतले पाहिजे. तंत्रज्ञानाचा वापर करून अल्प खर्चात दुप्पट उत्पनाचे तंत्र शिकून घ्या असे आवाहन सदर कार्यक्रम एम जी चे सचिव श्री अंकुशरावजी कदम यांच्या मार्गदर्शनाखाली एम जी एम हिल्स चे संचालक राजेंद्र रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला,यासाठी एम जी एम कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य नरेंद्र चव्हाण रा स यो समन्वयक प्रा. विकास शुक्रे,अतुल सरपाळे, निलेश चव्हाण, प्रा.सचिन देसाई विक्रम काळुंके, गणेश मते आदींनी मेहनत घेतली.

## देशाच्या विकासासाठी जलक्रांतीची गरज : प्रा प्रशांत अवसरमल



औरंगाबाद / प्रतिनिधी

कोणत्याही देशाच्या विकासासाठी जलक्रांतीची अतिशय गरज असून देशाचे भवितव्य उज्वल हवे असेल तर प्रथम आपल्या युवकांना अधिक सक्षम व सामर्थ्यवान बनवणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन जलक्रांती ग्रुपचे प्रा. प्रशांत अवसरमल यांनी केले.

महात्मा गांधी मिशन संचलित अन्नतंत्रदान महाविद्यालय, कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय व नानासाहेब कदम कृषी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर २०१८-१९ भिंदोन ता.जि. औरंगाबाद येथे आज दि.२१ फेब्रुवार रोजी उद्घाटन झाले.एकुण सात दिवस चालणाऱ्या याशिबिरात तब्बल पंच्याहत्तर विद्यार्थी आणि विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात सहभागी असून व विविध कार्यक्रम नियोजित केले आहेत यामधून गावाचा व भिंदोन जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होईल अशी अपेक्षा एम जीएमचे संचालक डॉ राजेंदर रेड्डी यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रा. महादेव भोसले यांनी केले.

सदर शिबिराचे उद्घाटन थाटात संपन्न झाले. याप्रसंगी श्रीमती आशाबाई बद्रीनाथ शिंदे (सरपंचभिंदोन) प्रमुख मार्गदर्शक: प्रा. प्रशांत अवसरमल (जलक्रांती ग्रुप महाराष्ट्र राज्य) श्री. अजयभाऊसाहेब शिंदे, डॉ. राजेंदर रेड्डी (संचालक, एम जी एम हिल्स गांधेली औरंगाबाद) डॉ.निलेश मस्के (शास्त्रज्ञ एम जी एम कृ. वि.कें.) डॉ. अनिल पांडे (प्राचार्य नानासाहेब कदम कृषी महाविद्यालय) डॉ. रवींद्र काळे (प्राचार्य अन्नतंत्र महाविद्यालय) डॉ. नरेंद्रसिंग चव्हाण (प्राचार्यकृषी जैवतंत्रदान महाविद्यालय) व प्रा. सचिन देसाई (विद्यार्थी कल्याण अधिकारी एमजी एम हिल्स) भिंदोन जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक नलावडे, मिनाक्षी राऊत यांच्यासह विद्यार्थी आणि पंचक्रोशीतील गावकऱ्याची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. आयोजक प्रा.सचिन देसाई, प्रा. महादेव भोसले, प्रा. विकास सूक्रे, प्रा. पांडुरंग कदम यांनी मेहनत घेतली.

प्रा.लि.करिता कदम प्रिंटोक्रॅट प्रा.लि.,ए-४/२ औद्योगिक वसाहत, चिकलठाणा, औरंगाबाद येथे प्रकाशित केले. दूरध्वनी क्र. औरंगाबाद (०२४०) २४
सीबीडी (बेलापूर), नवी मुंबई - ४००६१४, परभणी (०२४५२) २२२६३२, उस्मानाबाद (०२४७२) २२२४३४,
दैनिक 'लोकपत्र' मधील लेखांचे सर्व हक्क राखून ठेवले आहेत. RNI Register No. 66393/95 पोस्ट परवाना क्र. CR/RNP/AGD-155

# लोकपत्र

भूमिपुत्रांचा मित्र!

गुरुवार, दि. १६ जानेवारी २०१४ ४

## मराठवाडा युवक महोत्सवात एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे यश



औरंगाबाद, दि.१५/प्रतिनिधी - हॅथवे एमसीएनच्या वतीने आयोजित पाचव्या मराठवाडा युवक महोत्सवात एमजीएमच्या कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मुकाभिनय, वादविवाद, चित्रकला, मिमिक्री या कला प्रकारात सहभाग नोंदवत घवघवीत यश संपादन केले आहे.

पुजा मुळीक हिने चित्रकलास्पर्धेत व्दितीय, तर विशाल सावळे याने मि मिक्रीमध्ये व्दितीय क्रमांक पटकावला. संजय इंगळे व हंसप्रभा पोतदार यांनी वादविवाद स्पर्धेत तृतीय पारितोषिक मिळविले. तर पुनम क्षीरसागर, विशाल सावळे, जयश्री बागल, अन्सार शेख, शंतनु भवर, स्वप्नील ढवले, भिमराव जुमडे, आनंद कदम, पुनम अंभोरे, रोहिनी राठोड, राधा चव्हाण, अमोल साबळे यांच्या संघाने मुकाभिनयात तृतीय यश संपादन केले. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे शिक्षण संचालक तथा अधिष्ठाता डॉ.व्ही.एस. शिंदे, एमजीएम संस्थेचे चेअरमन कमलकिशोर कदम, सचिव अंकुशराव कदम, उपाध्यक्ष डॉ. पी.एम. जाधव, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रविण सुर्यवंशी, कृषीभूषण विजयअण्णा बोराडे, एम जीएम शिक्षण संचालक (कृषी) तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एन. चव्हाण यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# लोकपत्र

बुधवार, दि. १९ /०३/ २०१४

GOOD MORNING AURANGABAD

## गोदावरीच्या पात्राचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी केली कचऱ्याची होळी




औरंगाबाद/प्रतिनिधी

औरंगाबाद येथील एम.जी.एम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी गोदावरी पात्राची स्वच्छता करून कचऱ्याची होळी केली व होळी सण साजरा करण्याचा नवीन पायंडा पाडला. दि.१६ मार्च रोजी होळीच्या दिवशी राष्ट्रीय सेवा योजनेच्या २७ विद्यार्थ्यांनी गोदावरी पात्रामध्ये जाऊन प्लास्टीक पिशव्या, बॉटल्स, निर्माल्य, कपडे, खराब झालेले फोटो-फ्रेमस, पुस्तके ई. कचरा गोळा करुन (तीन ट्रॉली) जाळून उत्तम रीत्या विल्हेवाट लावली.

वरील कार्यक्रम संस्थेचे सचिव मा. अंकुशराव कदम यांच्या प्रेरणेतून व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.एन.चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी अशोक खर्डे तसेच एमजीएम कृषी विज्ञान केंद्राचे विषय विशेषज्ञ प्रा. तुषार चव्हाण हे उपस्थित होते.

# लक्ष्य गीत

## राष्ट्रीय सेवा योजना

उठे समाज के लिये उठे – उठे
जगे स्वराष्ट्र के लिये जगे– जगे
स्वयं सजे वसुंधरा सवार दे – २

हम उठे उठेगा जग हुमारे संग साथियो
हम बढे तोः सब बढेंगे अपने आप साथीयो
जमी पे आसामा को उतार दे –२
स्वयं सजे वसुंधरा संवार दे – २

उदासियो को दूर कर ख़ुशी को बांळ्ते चले
गांव और शहर कि दुरियो को पाटते चले
ज्ञान को प्रचार दे प्रसार दे
स्वयं सजे वसुंधरा संवार दे – २

समर्थ बाल वृद्ध और नारीया राहे सदा
हरे भरे बानो कि शील ओढती रहे सदा
तराक्कियो की एन नई कातर दे – २
स्वयं सजे वसुंधरा संवार दे – २

ये जाती धर्म बोलीया बने न शूल राह की
बढाये बेल प्रेम कि अखंडता कि चाह की
भावना से ये चमन निखार दे
सद्भावना से ये चमन निखर दे – २
स्वयं सजे वसुंधरा संवार दे – २

उठे समाज के लिये उठे – उठे
जगे स्वराष्ट्र के लिये जगे– जगे
स्वयं सजे वसुंधरा सवार दे – २